जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 SEP 2017
तरुण भारत

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये पहिल्यांदाच विद्यापीठाचा संघ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ३७ वा युवा महोत्सव विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात १४ ते १८ सप्टेंबर दरम्यान होत असून यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा संघ पहिल्यांदाच सहभागी होणार आहे. फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव गुरूवार १४ रोजी होणार असून, सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सव १६ रोजी पलूस येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित केला आहे. तर कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव १८ रोजी चंदगडमधील आर. बी. माडखोलकर महाविद्यालयात होईल. गारगोटी येथील कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालयात यंदाचा मध्यवर्ती युवा महोत्सव २५, २६ व २७ रोजी होणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी लोकनाट्य, लोककला, शास्त्रीय संगीत, शास्त्रीय गायन, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, एकांकीका, मूकनाट्य, लघुनाट्य, लोककला यासह २६ कलाप्रकारांचा समावेश आहे.



- फलटणमध्ये उद्या युवा महोत्सव
- सांगली जिल्ह्यात १६ रोजी तर कोल्हापूर जिल्ह्यात १८ रोजी

जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील पहिल्या तीन संघाची निवड मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील तीन असे नऊ संघ मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी होतील. जिल्हास्तरीय स्पर्धेत वक्तृत्व व सुगमसंगीत स्पर्धा वैयक्तिक पातळीवर होणार आहेत. तर मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये १५ कलाप्रकाराच्या स्पर्धा वैयक्तिक पातळीवर घेतल्या जाणार आहेत. १० कलाप्रकारातील स्पर्धा सांघिक पध्दतीने घेतल्या जाणार आहेत. २६ कलाप्रकारासाठी प्रत्येकी ३ अशा ७८ परीक्षकांची विद्यापीठाने नेमणूक केली आहे.

शिवाजी विद्यापीठातील संघ जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये पहिल्यांदाच सहभागी होत आहे. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नंदकुमार मोरे व डॉ. मीना पोतदार विद्यापीठ संघ प्रमुख म्हणूक काम पाहात आहेत. या संघामध्ये विद्यापीठातील ५० विद्यार्थ्यांनी ११ कलाप्रकारामध्ये सहभाग नोंदवला आहे. या सर्व कला प्रकाराची रंगीत तालीम विद्यापीठात सुरू आहे. पहिल्यांदाच जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विद्यापीठाचा संघ सहभागी होत असल्याचे समाधान विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

13 SEP 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# संशोधकांनी सत्याची कास धरावी

## आनंदकुमार : शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सामाजिक संशोधन हे आव्हानात्मक असते; त्यामुळे संशोधकांनी अत्यंत काळजीपूर्वक संशोधन करावे. समाजाची पुढील वाटचाल सामाजिक संशोधनावर आधारित असते. सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी नेहमी सत्याची कास धरली पाहिजे, असे प्रतिपादन इंडियन सोशॉलॉजिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. आनंदकुमार यांनी व्यक्त केले.




शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात समाजशास्त्र विभाग आणि सुरत येथील सेंटर फॉर सोशल स्टडीज यांच्यातर्फे आयोजित कार्यशाळेत प्रा. डॉ. आनंदकुमार यांनी मार्गदर्शन केले. शेजारी प्रा. डॉ. जगन कराडे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. बी. पाटील उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात यू. जी. सी. सॅप डीआरएस फेज - तीन अंतर्गत समाजशास्त्र विभाग आणि सुरत येथील सेंटर फॉर सोशल स्टडीज यांच्यातर्फे आयोजित केलेल्या पाचदिवसीय 'सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती' या विषयावरील कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते.

आनंदकुमार म्हणाले, संशोधकांनी नेहमी जिज्ञासू वृत्तीने राहायला हवे. त्यातून संवाद तयार होऊन ज्ञानाचा विस्तार होण्यास मदत होते. सद्य:कालीन काळात सर्वच विषय हे परस्परावलंबी असून, ती काळाची गरज बनलेली आहे. गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी संशोधकास विषयाशी तादात्म्य पावावे लागेल.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी केलेले संशोधन समाजाला कसे उपयोगी पडेल याचा विचार प्रथम करावा. समाजाची उन्नती ही नवनवीन शोधांमुळे होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होते. सद्य:कालीन युगात संशोधकांनी पारंपरिक पद्धतीने संशोधन न करता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून घेऊन संशोधन करावे.

या कार्यक्रमात विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केल; तर डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी माजी विभागप्रमुख डॉ. आर. बी. पाटील, डॉ. पी. एम. माने यांच्यासह एम. फिल., पीएच. डी.चे संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

13 SEP 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांनी सत्याची कास धरावी

## प्रा. डॉ. आनंदकुमार : समाजशास्त्र विभागातर्फे कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी नेहमी सत्याची कास धरली पाहिजे, असे मत इंडियन सोशॉलॉजिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. आनंदकुमार यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात यु. जी. सी. सॅप डिआरएस फेज - तीन अंतर्गत समाजशास्त्र विभाग आणि सुरत येथील सेंटर फॉर सोशल स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पाच दिवशीय "सामाजिक शास्त्रातील संशोधन पध्दती" या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. आनंदकुमार म्हणाले, 'सामाजिक संशोधन हे आव्हानात्मक असते.त्यामुळे संशोधकांनी अत्यंत काळजीपूर्वक संशोधन करावे. समाजाची पुढील वाटचाल ही सामाजिक संशोधनावर आधारित असल्याने संशोधकांनी नेहमी जिज्ञासू वृत्तीने राहायला हवे. त्यातून संवाद तयार होऊन ज्ञानाचा विस्तार होण्यास मदत होते.सद्यकालीन काळात सर्वच विषय हे परस्परावलंबी असून ती काळाची गरज बनलेली आहे. गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी संशोधकाने विषयाशी तादात्म्य व्हावे लागेल.'




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागात आयोजित कार्यशाळेत बोलताना डॉ. आनंदकुमार. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जगन्नाथ कराडे, प्रा. डॉ. आर. बी. पाटील.

प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी केलेले संशोधन समाजाला कसे उपयोगी पडेल यांचा विचार संशोधकांनी प्रथम करावा. समाजाची उन्नती ही नवनवीन शोधामुळे होण्यास मोठया प्रमाणावर मदत होते.सद्यकालीन युगात संशोधकांनी पारंपरिक पध्द्तीने संशोधन न करता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन घेवून संशोधन करावे.'

समाजशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख, प्रा. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी विभागाचे माजी विभागप्रमुख, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. पी. एम. माने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स




शिवाजी विद्यापीठा आयोजित 'सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती' या विषयावरील कार्यशाळेत बोलताना डॉ. आनंदकुमार. सोबत डावीकडून डॉ. जगन कराडे, डॉ. डी. टी. शिर्के व डॉ. आर. बी. पाटील.

# 'सामाजिक संशोधकांनी सत्याची कास धरावी'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'समाजाची पुढील वाटचाल ही सामाजिक संशोधनावर आधारित असते, त्यामुळे सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी नेहमी सत्याची कास धरावी,' असे मत इंडियन सोशालॉजिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष, प्रा. डॉ. आनंदकुमार यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात यूजीसी सॅप डीआरएस फेज - तीन अंतर्गत समाजशास्त्र विभाग आणि सूरत येथील सेंटर फॉर सोशल स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. आनंदकुमार म्हणाले, 'सामाजिक संशोधन हे आव्हानात्मक असते, त्यामुळे संशोधकांनी अत्यंत काळजीपूर्वक संशोधन करावे. समाजाची पुढील वाटचाल ही सामाजिक संशोधनावर आधारित असते. संशोधकांनी नेहमी जिज्ञासू वृत्तीने राहायला हवे. त्यातून संवाद तयार होऊन ज्ञानाचा विस्तार होण्यास मदत होते. गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी संशोधकाने विषयाशी तादात्म्य व्हावे लागेल.'

प्र. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी केलेले संशोधन समाजाला कसे उपयोगी पडेल यांचा विचार संशोधकांनी प्रथम करावा. समाजाची उन्नती नवनवीन शोधामुळे होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होते. संशोधकांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन संशोधन करावे.'

विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. आर. बी. पाटील, डॉ. पी. एम. माने यांच्यासह एम. फील., पीएचडीचे संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 SEP 2017
लोकमत

## आनंद कुमार यांचे आज विद्यापीठामध्ये व्याख्यान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे आज, बुधवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात 'डॉमिनंट कास्टस् डेमोक्रसी अँण्ड द सिक्स डेफिसिटस् ऑफ द इंडियन नेशन-स्टेट' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. या व्याख्यानासाठी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक व इंडियन सोशॉलॉजिकल सोसायटीचे माजी अध्यक्ष डॉ. आनंद कुमार हे प्रमुख वक्ते आहेत, तरी त्याचा लाभ विद्यार्थी, शिक्षक, संशोधक विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 SEP 2017
पुढारी

# विद्यापीठामध्ये डॉ. कुमार यांचे व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे बुधवारी (दि. १३) सकाळी अकरा वाजता मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात मडॉमीनंट कास्टस् डेमोक्रसी ॲण्ड द सिक्स डेफीसिटस् ऑफ द इंडियन नेशन- स्टेट या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. या व्याखानासाठी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक व इंडियन सोशॉलॉजिकल सोसायटीचे माजी अध्यक्ष डॉ. आनंद कुमार यांना निमंत्रित केले आहे.